# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६० वी बैठक दिनांक २४ जुलै २००९

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६० वी बैठक दि. २४ जुलै २००९ रोजी जलसंपदा विभागाचे परिषद सभागृह,मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. आनंदराव पाटील | ... | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. सुनिल सोनी | ... | प्रधान सचिव (नियोजन) |
| ४. | मा. इं. व्यं. वि. गायकवाड | ... | सचिव (जसं) व सदस्य |
| ५. | मा. इं. ए. बा. पाटील | ... | सचिव (लाक्षेवि) व सदस्य |
| ६. | इं. ह. य. कोळवले | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. वानखेडे, उपसचिव | ... | अप्पर मुख्य सचिव (वन) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्रीमती. एम. व्ही. कोकणे, सहसचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. सु. ल. पाटील | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ३. | श्री. शिलानाथ जाधव | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) |

सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**(इंजि. ह. य. कोळवले)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६० वी बैठक दिनांक २४ जुलै २००९

ठराव क्र. ६०/१

"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ५९ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र. ६०/२

"ठराव करण्यांत येतो की, मौजे सोळशी, ता. कोरेगांव, जि. सातारा यांना सार्वजनिक नळपाणी पुरवठा विहिरीसाठी नांदवल ल. पा. तलावासाठी संपादित गट नं.१२५० ख मधील २ आर जमिन भविष्यात महामंडळास लागणार नसल्याने, सदर अतिरिक्त असलेल्या जमिनीची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देणेत येत आहे."

ठराव क्र. ६०/३

"ठराव करण्यात येतो की,

१. रिकाम्या जागा, निवासी/अनिवासी इमारती इ. चे विविध कारणासाठींचे दर हे दि. १३/१/२००५ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ४२ व्या बैठकीत मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर दर हे साधारणपणे पाच वर्षापूर्वीचे असल्याने हे दर सुधारित करुन सुधारित दरांच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मंजूरी घ्यावी.
२. महामंडळाच्या ताब्यात असलेली जमीन/इमारत सरकारी कार्यालयांस भाड्याने देण्याआधी कायदे विषयक सल्ला घेण्यात यावा.
३. वरील अ.क्र. १ व २ च्या पूर्ततेनंतर इंदापूर येथील पाटबंधारे वसाहतीमधील रिक्त व विनावापर पडून असलेली इमारत (एकूण क्षेत्रफळ २३२६ चौ. फूट) तालुका कृषि अधिकारी, इंदापूर या शासकीय कार्यालयास एक वर्षाच्या मुदतीसाठी भाडेपट्टयाने (सुधारित दरानुसार) देण्याचा प्रस्ताव नियामक मंडळाच्या बैठकीत फेरसादर करावा"

ठराव क्र. ६०/४

(अ) "ठराव करण्यात येतो की, मौजे चिंचोली (कोकणे), ता.आंबेगाव, जि. पुणे यांनी यशवंत ग्रामसमृध्दी कार्यक्रमांतर्गत नळपाणी पुरवठा योजनेकरिता पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणेकरिता डिंभे डावा कालवा कि.मी.१६ मधील गट क्र.१२६ पैकी मागणी केलेली १ आर जागा महामंडळाकडे जमीनीची शासकीय दराने होणारी किंमत व नियमित पाणीपट्टी

(इंजि. ह. य. कोळवले)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

भरण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करणेस नियामक मंडळाची मान्यता देणेत येत आहे."

(ब) ग्रामीण पाणी पुरवठ्यासाठी जागा देण्यासाठीचे विषय प्रत्येक वेळी नियामक मंडळाच्या बैठकीत ठेवण्यापेक्षा शासनाच्या विविध स्त्रोतातून / कार्यक्रमाद्वारे मंजुरी मिळालेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांच्या विहीर / पाण्याची टाकी इ. साठी २ आर पर्यंत जागा देण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना प्रदान करणे बाबतचा विषय नियामक मंडळाच्या आगामी बैठकीत ठेवावा.

ठराव क्र. ६०/५

''ठराव करण्यात येतो की, धोम-बलकवडी उजवा कालवा कि.मी.६ व ७ साठी संपादीत समाईक क्षेत्रातील विहीरीपासून ते गोठ्यापर्यंत ३ इंच व्यासाची व ८१ मीटर लांबीच्या पाईप लाईनची नुकसान भरपाई रु.९४३३/- (रुपये नऊ हजार चारशे तेहतीस फक्त) श्री.मनोहर चिंतामण जोशी यांना अदा करण्याचा प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.''

ठराव क्र. ६०/६

"ठराव करण्यात येतो की, टेंभू बंधाऱ्याचे बुडीत क्षेत्रात येणाऱ्या टेंभू, ता.कराड येथील नवीन नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामासाठी रु.१८.७६ लक्ष निधी देण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ६०/७

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडील मोठ्या/मध्यम प्रकल्प उपसा सिंचन योजनेच्या प्रस्तावांना केंद्रीय जल आयोग / पर्यावरण व वन मंत्रालय / नियोजन आयोगाची मान्यता तसेच एआयबीपी अंतर्गत प्रकल्पांना अर्थसहाय्य प्राप्त करुन घेण्यासाठी केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली येथे पाठपुरावा करण्यासाठी श्री. के. व्ही. भट यांना महामंडळास सहाय्यक म्हणून १ वर्षे मुदतवाढ देण्यास व त्यांचे निश्चित करण्यात आलेले मानधन/अटी व शर्तीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे"

ठराव क्र. ६०/८

"ठराव करण्यात येतो की, जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेस महामंडळाने यापूर्वीच मंजुरी दिलेल्या २५ को. प. बंधा-यांव्यतिरिक्त अतिरिक्त ७ को. प. बंधारे बांधण्याच्या प्रस्तावास

| | |
|---|---|
| (इंजि. ह. य. कोळवले) | (मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर) |
| कार्यकारी संचालक | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.) |
| म.कृ.खो.वि.म, पुणे | व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६० वी बैठक दिनांक २४ जुलै २००९

नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. अशा प्रकारे एकूण ३२ को. प. बंधा-यांचा समावेश योजनेच्या सुधारित प्रकल्प अहवालात करणेत यावा."

ठराव क्र. ६०/९

"सन २००७-०८ मध्ये जून २००८ अखेर सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट व साध्य तसेच सन २००८-०९ मध्ये जून-२००९ अखेर सिंचन क्षमता निर्मितीचे उद्दिष्ट" हा विषय मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही.

ठराव क्र. ६०/१०

"ठराव करण्यात येतो की, टेंभू प्रकल्पांतर्गत उर्ध्वगामी नलिकेसाठी गट नं.४३० मधील संपादीत क्षेत्रामध्ये असलेले बिरोबा मंदीर स्थलांतरीत करणेसाठी टेंभू प्रकल्पासाठी संपादीत गट क्र.४४० मधील उर्वरित सद्य:स्थितीत विनावापर असलेले ०.२९ हे. क्षेत्रापैकी ०.०५ हे. क्षेत्र जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे हस्तांतरीत करणेसाठी नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."

ठराव क्र. ६०/११

"५२ टीएमसी पाणीसाठा निर्मिती कार्यक्रमातील सन २००८-०९ मधील (जून २००९ अखेरचे) उद्दिष्ट व साध्य" हा विषय नियामक मंडळाचे अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आलेला नाही.

ठराव क्र. ६०/१२

"ठराव करण्यांत येतो की, सन २००७-०८ च्या बाराव्या वार्षिक अहवालास मान्यता देणेत येत आहे. तसेच हा अहवाल शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. "

ठराव क्र. ६०/१३

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने मौजे काटेवाडी तालुका बारामती येथील नळपाणी पुरवठा योजनेच्या साठवण तलावासाठी मागणी केलेली निरा डावा कालवा कि.मी. क्र.९९, गट क्रमांक २७३ लगतची ३ हेक्टर जागा भविष्यात महामंडळास लागणार नसल्याने सदर अतिरिक्त जागा कालव्याच्या काटछेदाच्या सुरक्षिततेच्या व स्थैर्याच्या दृष्टीने सरक वर्तुळ पृथ:करण पध्दतीने तपासणी करून त्यानुसार कालव्याच्या बाहेरील टो पासून सुरक्षित अंतर सोडून देण्यास व सदर जागेची शासकीय दराने होणारी किंमत महामंडळास

(इंजि. ह. य. कोळवले)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६० वी बैठक दिनांक २४ जुलै २००९

मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे, यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषयः-

ठराव क्र.६०/१४

“ठराव करण्यांत येतो की,प्रकल्पग्रस्तांसाठी अपवादात्मक प्रकरण (**exceptional case**) म्हणून बुध्दिहाळ मध्यम प्रकल्पातील गाळपेर जमीनी प्रकल्पग्रस्त शेतक-यांच्या मौजे गौडेवाडी सहकारी सामुदायिक संस्था मर्यादित गौडेवाडी यांना २१०.२० एकर व सोमेवाडी सहकारी सामुदायिक संस्था सोमेवाडी यांना ३६३.१० एकर अशी एकूण ५७३.३० एकर (२३२ हे.) जमीन कसण्यासाठी रू. १०० प्रति वर्ष / प्रति हेक्टर दि. ३१.३.२००९ च्या पुढे ११ महिने मुदतीच्या कराराने भाडेपट्टयाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.”

ठराव क्र. ६०/१५

“ठराव करण्यात येतो की, जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेच्या रायझिंग मेनचे काम पुन्हा सुरु करणेसाठी सुभाष + बी. टी. पाटील + एन. व्ही. खरोटे - संयुक्त अभियान यांना खालील अटींचे अधिन राहून रु. १२.६३ कोटीचा मोबीलायझेशन ॲडव्हान्स देणेबाबतच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.”

अटी :

1. **Mobilization advance will be granted against a irrevocable bank guarantee of Nationalosed Bank/Schedule Bank from the state of Maharashtra which should be valid for the period till the full recovery of Mobilization advance alongwith interest. Mobilisation advance will be deducted form running account bills being paid.**
2. **The recovery will be started from next bill of rising main and will be recovered completely before 70% of the amount is paid through RA bills on proportionate basis on amount of R.A. bills.**
3. **The rate of interest will be the PLR (Prime Lending Rate) of S.B.I. plus 2%. Amount of interest will be calculated on monthly basis and added to the principle amount, which will be deducted.**
4. **A letter to the bank on prescribed format by the MKVDC will be submitted stating the above conditions and acknowledgement will have to be obtain from bank by contractor. This letter will be submitted to the bank from where the bank guarantee is issued by the corporation also simultaneously**

(इंजि. ह. य. कोळवले)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६० वी बैठक दिनांक २४ जुलै २००९

for confirmation of the acceptance of condition of mobilization advance by the contractor as it is supported by a bank guarantee.

5. Mobilization advance so disbursed for steel plate/pipe purchase should not be diverted to any other purpose other than for which it is given and details of expenditure has to be submitted to department on monthly/ fortnightly basis as demanded by the Engineer-In-Charge of the work.
6. In case Engineer-In-Charge is not satisfied he will have the right to call back the advance by giving a notice in writing and in case the contractor fails, to comply the same, Engineer-in-Charge will encash the bank guarantee to the extent of the diversion of funds as judged by the Engineer-In-Charge.
7. It is mandatory on the part of contractor to submit the Cash-Flow of mobilization advance every month supported by documents to the Engineer-In-Charge failing which Engineer-In-Charge will have the full right to call back advance & encash the bank guarantee.
8. The contractor shall execute bank guarantee and guarantee bond in lieu of mobilization advance in prescribed format.
9. Executive Director with assistance of Chief Accounts & Finance Officer should frame the schedule of recovery of this advance in such manner that advance shall be recovered within one year or by such time when 70% amount of this work is paid through R.A. Bills, whichever is earlier.

**ठराव क्र.६०/१६**

**“ठराव करण्यांत येतो की, मौजे मलवडी, ता. माण, जि. सातारा यांना स्वजलधारा सार्वजनिक नळपाणी पुरवठा योजनेअंतर्गत विहिरी खोदाईसाठी आंधळी ल. पा. तलावाचे बुडीत क्षेत्रातील सर्व्हे नं. २६८/११ मधील ४ आर जागा भविष्यात या खात्यास लागणार नसल्याने, सदर अतिरिक्त असलेल्या जागेची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देणेत येत आहे.”**

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**“मान्य”**

(इंजि. ह. य. कोळवले)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे